सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. संतोष परचुरे
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/६०९ दिनांक : १९/०५/२०२३

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : महाविद्यालयांमध्ये तृणधान्यांबाबत जागृती या कार्यक्रमांतर्गत राबवावयाचे उपक्रमांबाबत...**
**संदर्भ : पौतृव–२०२३/प्र.क्र.३७/आस्था–२ दिनांक ११ मे, २०२३ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. त्या अनुषंगाने राज्यातील तृणधान्य पिकांचे उत्पादन वाढविणे तसेच सदर पिकांच्या पोषण मूल्यांबाबत लोकांमध्ये जनजागृती करून आहारातील वापर वाढविणेबाबत प्रचार व प्रसिध्दी करणे या बाबी राबविण्यासाठी "महाराष्ट्र श्री अन्न (पौष्टिक तृणधान्य) अभियान" राज्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार आपण आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील व आरोग्यासाठीचे महत्व अधोरेखित करण्याकरिता सन २०२३ या वर्षामध्ये महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती या कार्यक्रमांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१) हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयांमध्ये तृणधान्यांच्या पाककृती संदर्भात जागृकता/प्रचार प्रसार यांचा अंतर्भाव करणे.
२) महाविद्यालयातील वसतीगृहांच्या भोजनालयामध्ये पौष्टिक तृणधान्यांचा वापर करणे.
३) महाविद्यालयांमध्ये अध्यापक व विद्यार्थ्यांकरिता "पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील महत्व" या विषयावर स्थानिक पातळीवरील आहारतज्ञांची/डॉक्टरांची/गृह विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करणे.
४) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक तृणधान्यांच्या आहारातील महत्वाच्या अनुषंगाने तृणधान्यांच्या पाककृतीच्या स्पर्धांचे आयोजन करणे.
५) महाविद्यालयांमध्ये अस्तित्वात असलेल्या कलापथकांमार्फत पौष्टिक तृणधान्याच्या वापराबाबत पथनाटय सादर करणे.

या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. शासन निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामूहिक सहभागातून कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत संबंधितांना सूचित करावे.

शासन निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये आपणामार्फत आयोजित कार्यक्रमाचा अहवाल (www.Unipune.ac.in – students development – bsd online – college login- for college users – login-main menu – students development – menu – gov/institute joint scheme proposal report – other joint scheme proposal report – create new application – योजना निवडा – " **तृणधान्यांबाबत जागृती कार्यक्रम अहवाल**") येथे ऑनलाईन पध्दतीने प्राधान्याने भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

डॉ. संतोष परचुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ


भ्रमणध्वनी : ०९२७२७२७९९९, ०८२७५५१५३५४, ईमेल : sdparchure@gmail.com, bsd@unipune.ac.in
कार्यालय: ०२०–२५६२२६८०, ०२०–२५६२२६८७, संकेतस्थळ : http://www.unipune.ac.in/bsd

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२८२०३०४ ई-मेल- ds.sashi-hted@mah.gov.in

---

क्रमांक:पौतृव-२०२३/प्र.क्र.३७/आस्था-२ दिनांक ११ मे, २०२३

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे,
समूह विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

२) संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) संचालक (तंत्रशिक्षण), एलफिस्टन तंत्रशिक्षण विद्यालय आवार,
महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.

विषय:- "अकृषि विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती" या कार्यक्रमांतर्गत राबवावयाचे उपक्रम.

महोदय,

संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२३ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष" म्हणून घोषित केले आहे. त्या अनुषंगाने राज्यातील तृणधान्य पिकांचे उत्पादन वाढविणे तसेच सदर पिकांच्या पोषण मूल्यांबाबत लोकांमध्ये जनजागृती करुन आहारातील वापर वाढविणेबाबत प्रचार व प्रसिध्दी करणे या बाबी राबविण्यासाठी "महाराष्ट्र श्री अन्न (पौष्टिक तृणधान्य) अभियान" राज्यामध्ये राबविण्यात येत आहे.

२. "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष" च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या सूचनांनुसार शासनाच्या कृषि विभागाबरोबरच अन्य विभागांनीही पौष्टिक तृणधान्य पिकांचा विकास व जनतेच्या आहारामध्ये पौष्टिक तृणधान्याचा समावेश वाढविण्याबाबत उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

३. ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, वरई, कोदो, कुटकी, सहावा, राजगिरा यासारखी पौष्टिक तृणधान्य ही कर्बोदके, तंतुमय पदार्थ, प्रथिने, जीवनसत्वे व खनिजांनी समृध्द आहेत. पौष्टिक तृणधान्यामध्ये कॅलशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, लोह इत्यादी खनिजे मुबलक प्रमाणात असतात. पौष्टिक तृणधान्य ही पचनास हलकी असतात. अलिकडील काळात युवकांच्या आहारामध्ये पौष्टिक तृणधान्यांचा वापर कमी होत आहे. बदलत्या जीवनशैलीमध्ये युवकांचे आरोग्य सुस्थितीत राहावे याकरिता त्यांच्यामध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृकता निर्माण करणे आवश्यक आहे.

४. राज्यातील कृषितर विद्यापीठे व या विद्यापीठांतर्गत कार्यरत असणारी शासकीय महाविद्यालये, अशासकीय अनुदानित महाविद्यालय व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील व आरोग्यासाठीचे महत्व अधोरेखित करण्याकरिता सन २०२३ या वर्षामध्ये “अकृषि विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती” या कार्यक्रमांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

१) हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयामध्ये तृणधान्यांच्या पाककृती संदर्भात जागृकता/प्रचार प्रसार यांचा अंतर्भाव करणे.

२) विद्यापीठे व महाविद्यालयातील वस्तीगृहांच्या भोजनालयामध्ये पौष्टिक तृणधान्यांचा वापर करणे.

३) विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अध्यापक व विद्यार्थ्यांकरिता “पौष्टिक तृणधान्यांचे आहारातील महत्व” या विषयावर स्थानिक पातळीवरील आहारतज्ञांची /डॉक्टरांची /गृह विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करणे.

४) विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक तृणधान्यांच्या आहारातील महत्वाच्या अनुषंगाने तृणधान्यांच्या पाककृतीच्या स्पर्धांचे आयोजन करणे.

५) विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अस्तित्वात असलेल्या कलापथकांमार्फत पौष्टिक तृणधान्याच्या वापराबाबत पथनाटय सादर करणे.

६) राष्ट्रीय सेवा योजनांच्या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधान्यांची ओळख होण्याच्या अनुषंगाने नजीकच्या परिसरात क्षेत्रभेटी आयोजित करणे. सदर उपक्रमा दरम्यान पौष्टिक तृणधान्यांचे आरोग्यातील महत्त्व या विषयी आहारतज्ञांचे च्या व्याख्यानांचे आयोजन करणे.

७) विद्यापीठे व महाविद्यालयांच्या परिसरामध्ये सूचना फलकांमध्ये किंवा अन्य योग्य ठिकाणी पौष्टिक तृणधान्यांच्या आहारातील महत्वा विषयीचे वर्तमानपत्रातील /मासिकांमधील लेख प्रदर्शित करणे.

८) पौष्टिक तृणधान्यांचे बियाणे त्यांच्या शास्त्रीय व स्थानिक नावांसह तसेच त्यांचे पोषण मूल्य व आहारातील महत्त्व याच्या तपशिलासह विद्यापीठे व महाविद्यालयांच्या दर्शनी भागामध्ये ठेवावेत.

५. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ निमित्त सन २०२३ या वर्षामध्ये "अकृषि विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये पौष्टिक तृणधान्यांबाबत जागृती" या कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यापीठे व त्या अंतर्गत महाविद्यालयांमध्ये उपरोक्त उपक्रम राबविण्यात यावेत. तसेच जुलै ते ऑगस्ट, सप्टेंबर ते ऑक्टोबर व नोव्हेंबर ते डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा कार्यवाहीचा विद्यापीठनिहाय अहवाल अनुक्रमे माहे सप्टेंबर, नोव्हेंबर व जानेवारी २०२४ या महिन्यांच्या १० तारखेपूर्वी शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

(अशोक मांडे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव :-

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबईख्.
२) मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) उप सचिव (विशि) उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६) उप सचिव (मशि) उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) उप सचिव (तांशि) उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) कक्ष अधिकारी (आस्था-२), उच्च व तंत्रशिक्षण (निवडनस्ती)